# EXTRA ORDINARY GENERAL MEETING

**Date**: Saturday, June 20th, 2020

**Time**: 11.00 am. (IST)

**Mode and Deemed Venue:** Through Video Conferencing Facility (CISCO WebEx),
At post Pimpali, Tal- Baramati, Dist-Pune-413102

**Corporate Participants:**

1) Mr. Rajendra D. Pawar : Chairman and Managing Director
2) Mrs. Vijaya Hiremath: Independent Director
3) Mr. Subhash Kore: CFO
4) Mr. Devendra Kulkarni: Company Secretary

**Statutory Auditors:**

1) CA Suhrud Lele, Partner, Kirtane & Pandit LLP

**Scrutinizer:**

1) CS Hrishikesh Wagh: Partner, KANJ and Co. LLP

- **Welcome Address – Mr. Devendra Kulkarni**

नमस्कार, मी देवेंद्र कुलकर्णी, आपल्या बारामती ऍग्रो संस्थेचा कंपनी सेक्रेटरी, या विडिओ कॉन्फरन्सिंग मीटिंगद्वारे जमलेल्या सर्व सभासदांचे आणि आपल्या चेअरमन साहेबांचे व डायरेक्टर विजया मॅडम यांचे स्वागत करतो. आपण सर्व जण प्रथमच अशा पद्धतीने भेटत आहोत याचे कारण कोरोना मुळे कुठल्याही प्रकारची फिजिकल मीटिंग घेण्याची अनुमती नाही.  त्यामुळे आपण ही विशेष सर्वसाधारण सभा विडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित केली आहे. सदर सभे संदर्भात काही शंका असल्यास सभासदांनी चॅट बॉक्स मध्ये प्रश्न पाठवावे.

पुढील काही क्षणात. आपले चेअरमन साहेब आदरणीय मोठे दादा आपल्याशी या मीटिंग संदर्भात संवाद साधणार आहेत. मी चेअरमन साहेबाना विनंती करतो की त्यांनी सभासदांना संबोधित करावे.

- **Chairman's Speech – Mr. Rajendra D. Pawar**

सर्वप्रथम, या विडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सभेसाठी जमलेल्या सर्व सभासदांचे स्वागत. आपल्याला कल्पना आहेच की सद्यस्थितीमध्ये आपण सगळे कोरोना वैश्विक महामारीच्या भयंकर संकटातून जात आहोत अशा कठीण परिस्थितीत आपण स्वतःची आणि आपल्या कुटुंबातील सदस्यांची काळजी घेत असणारच ही अपेक्षा आहे.

आपण सर्वजण खात्री बाळगूया की एकत्रित प्रयत्न व संयमातून या संकटातून आपण लवकरच बाहेर पडू.
आज, आपण ही विशेष सर्वसाधारण सभा विडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित केली आहे, त्याचे कारण की आपल्याला माहिती आहे की कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सरकारतर्फे विविध उपाय योजना राबविण्यात आल्या आहेत.

त्याचाच एक भाग म्हणून मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स ("एम. सी. ए.") ने कोविड-१९ चा उद्रेक दूर करण्यासाठी खबरदारी म्हणून, सर्व कंपन्यांना जर सभासदांची सभा घेण्याची आवश्यकता असल्यास ती सभा विडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यात यावी अशा सूचना दिली आहे. त्या अनुषंगाने, बारामती ॲग्रो लिमिटेड ने ही सभा या अभिनव पद्धतीने आयोजित केली आहे.

सदर सभेच्या अजेन्डामध्ये सांगितल्या प्रमाणे आपल्या कंपनीचे नवीन स्टॅच्युटरी ऑडिटर, मेसर्स कीर्तने अँड पंडित, चार्टर्ड अकाउंटंट यांच्या नियुक्तीला आपल्या सभासदांची मान्यता मिळावी असा ठराव मी या सभेपुढे मांडत आहे.

आपल्या कंपनीच्या संचालक मंडळाने कीर्तने & पंडित, चार्टर्ड अकाउंटंट यांची नियुक्ती ही कंपनीचे आर्थिक वर्ष २०१९-२० च्या ऑडिट साठी केलेली आहे. तरी जमलेल्या सर्व सभासदांची या ठरावास सर्व मताने मान्यता मिळावी अशी विनंती आहे.

सभासदांना विनंती आहे की ज्या सभासदांनी यापूर्वी सदर ठरावासाठी रिमोट ई-वोटिंगद्वारे मतदान केलेले नाही, त्यांनी ह्या सभेनंतर ई-वोटिंग सिस्टिमद्वारे मतदान करावे. या संदर्भातील अधिक माहिती साठी सभेनंतर, त्वरित आपल्या कंपनीचे सचिव श्री. देवेंद्र कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधावा.

पुन्हा एकदा आपल्या सर्वांना व कुटुंबातील सदस्यांना पुढील काळासाठी सुरक्षितता व उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा!!!

- **Voting instructions – Mr. Devendra Kulkarni**

सर थँक यू.  सर्व सभासदांच्या वतीने, मी चेअरमन साहेबांचे आभार मानतो आणि त्यांनी सांगितल्याप्रमाणे ज्यांनी रिमोट ई-वोटिंग मार्फत मतदान केले नाही त्यांनी एन. एस. डी. एल. च्या वेबसाइटवर जाऊन आपले मतदान नोंदवावे. ई-वोटिंग ची लिंक चॅट बॉक्समध्ये दिलेली आहे. वोटिंग विषयी अधिक माहिती असल्यास कृपया माझ्याशी संपर्क साधावा.

या सूचनेबरोबरच आजची सभा संप्पन झाली असे मी जाहीर करतो. पुन्हा एकदा आपल्या सर्वजणांचे मनापासून धन्यवाद!

---

**Meeting concluded at: 11:15 AM**